**महाराष्ट्र विधानसभा**
**तिसरे अधिवेशन, २०२४**
**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४**
**महिला व बालविकास विभाग**
**कपात सूचनांची एकूण संख्या - १०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एक्स-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- १,३२,४०,१५,०५,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१) | ६३४४ | १० | सन २००८ पासून राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या व शेतमजूरांच्या मुलींच्या सामुहिक किंवा नोंदणीकृत विवाहासाठी शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजना आवश्यक असलेल्या मंगळसुत्र व इतर वस्तुंची खरेदी करण्यासाठी प्रती जोडपे १० हजार एवढे अनुदान कुटुंबाच्या नावाने शासनातर्फ धनादेशाद्वारे देण्यात येणे, तसेच सामुहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे २ हजार एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येणे, सदर योजनेपासून मिळणाऱ्या अनुदानात वाढत्या महागाई नुसार वाढ करण्याचा विचार असणे, तसेच ही योजना गरीब, सर्व सामान्यांसाठी हिताची असल्यामुळे शेतकरी व शेतकरी मजूर कुटुंबापर्यंत मर्यादित न ठेवता योजनेच्या लाभार्थी नियमात बदल करणे गरजेचे असणे, तसेच शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजनेची आणखी प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हास्तरावर राबविणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६३४५ | १० | राज्यात नवीन महिला धोरण तयार करण्यात यावे अशी मागणी राज्यातील महिला बचत गटांनी मा. महिला आणि बालविकास मंत्री यांच्याकडे केली असणे, दुर्लक्षित, दुर्गम आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेणे, महिला संख्या जास्त असलेल्या उद्योगात पाळणा घराची सोय करणे, ऊसतोडणी करणा-या महिलांसाठी वसतिगृहे बांधणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी महिला वर्गात व रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | ६३४६ | १० | हॅपी कीड डे केअर (पाळणाघर) डोंबिवली जि. ठाणे या पाळणाघरात लहान चिमुकल्या मुलींना व मुलांचा छळ व मानसिक त्रास दिला जात असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले असणे, या संदर्भात तक्रार करुनही कठोर कार्यवाही केली जात नसणे, मुलींचा छळ होत असणे, मुलांना बांधून ठेवणे उलटे टांगण्याचे प्रकार होत असणे, ही बाब गंभीर असणे, शासनानी कठोर कार्यवाही करुन दाखल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, विविध परिसरात व जिल्हयात शासनाने पाळणाघर बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेले भितीचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६३५९ | १० | संग्रामपूर, जि. बुलढाणा येथील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना कुपोषणावर मात करण्यासाठी वटप करण्यात येणे, ज्यावेळेस आहार देण्यात येतो तो पाकिट बंध पूरक पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहे २०२४ मध्ये उघडकीस आले असणे, सदर तपासणीअंती अंगणवाडयांना पुरविण्यात आलेला घरपोच आहार खाण्यायोग्य नसणे, या बाबीची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे व पोषण आहार चांगला दर्जाचा देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६३६० | १० | राज्यात माझी कन्या भाग्यश्री या योजनेत सुधारणा करुन “लेक लाडकी” ही योजना माहे एप्रिल, २०२३ मध्ये सुरु केली असणे, योजनेसाठी शासनाने रुपये १०० कोटीची तरतूद करुनही केवळ रु.१९ कोटी ७० लाख इतका निधी वितरीत केला असणे, सदर योजनेत निधी देण्यात कमतरता करणे, मुलीचा जन्मदर वाढविणे व मृत्यू दर कमी करणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाहय मुलीचे प्रमाण शुन्यावर आणणे, सदरच्या योजनेसंदर्भात जनजागरण करण्याची आवश्यकता निर्माण झाले असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६३६१ | १० | अंगणवाडी श्रेणीवर्धनाकरीता प्रति अंगणवाडी रु.२ लक्ष प्रमाणे ४९ अंगणवाडी केंद्राकरीता रु.९७.०० लाख तसेच अंगणवाडी इमारत देखभाल व दुरुस्तीकरीता प्रति अंगणवाडी रु.३००/- प्रमाणे २७१ अंगणवाडी केंद्राकरीता रु.८-१३ लाख अशाप्रकारे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य हिश्याचा एकूण रु.१०६.१३ लाख इतका निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालया मार्फत जिल्हा परिषद, नागपूर यांना वितरीत करण्यात येणे, नागपूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जिल्हा परिषदेअंतर्गत १३ बाल विकास प्रकल्प कार्यालयांपैकी नागपूर (ग्रामीण) या एका बाल विकास प्रकल्प कार्यालयाने अंगणवाणी केंद्राचे साहित्य प्रत्यक्षात प्राप्त होण्यापूर्वी संबंधित पुरवठा धारकास देयके अदा करण्यात आला असणे, त्यानुषंगाने शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६४९८ | १० | राज्यात "बेटी बचाओ - बेटी पढाओ" असे अभियान राबविले जात असणे, या योजनेकरीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामधील शिल्लक असलेल्या रुपये १५,९९,९३७/- पैकी रुपये १०,१४,७६२/- एवढी रक्कम सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आले असणे, मात्र शासनाने वाशिम, परभणी, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयात निधी दिला नसणे, त्यामुळे अभियान राबविणे अडचणीचे झाले असणे, योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी जिल्हास्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६४९९ | १० | राज्यातील महिलांना सशक्तीकरण करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर,२०२३ च्या दरम्यान घेतला असणे, महिलांचे सशक्तिकरण झाले नसणे, शासकीय योजना लोकाभिमुख करण्याची गरज असणे, अमलबजावणी गतीमान करण्याची आवश्यकता असणे, शासनाने "मुख्यमंत्री महिला सशक्ती करण अभियान" राबविणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६५०० | १० | राज्यात नागरी, ग्रामीण, आदिवासी विभाग व डोंगरी विभागात विविध ठिकाणी अंगणवाडी शासनाने भाडे तत्वावर घेतली असणे, त्याचे भाडे ग्रामीण / आदिवासी क्षेत्र रु.२०००/-, नागरी क्षेत्र (महानगर वगळून) रु. ६०००/- व महानगर रु.८०००/- प्रति महा असे विविध स्वरुपात भाडे वाढ शासनाने केली असणे, सन २०२३-२०२४ या वर्षापासून सुधारित भाडे दर आकारले जाणार असणे, मात्र अद्यापही संबंधितावना भाडे अदा केले नसणे, अंगणवाडीचे भाडे तातडीने अदा करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६५०१ | १० | राज्यात अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनिस यांच्या नेमणुका दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयानुसार केल्या जात असणे, अशा अंगणवाडीमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त असणे, म्हणजेच उदा- उर्दू, हिन्दी, माडीया गोंड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकू, तेलगू, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भिलोरी, बंजारा इत्यादी भाषेची असणे, त्यामुळे अंगणवाडीमध्ये सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडीमध्ये सेविका या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्यांचीच नियुक्ती करणे, असे शासन निर्णयात नमूद केले असणे, मात्र प्रत्यक्षात त्या पध्दतीने नेमणूक केली जात नसल्याचे निदर्शनास आले असणे, उर्दू भाषेचे ज्ञान असलेल्यांची नेमणूक करण्याची आवश्यकता भासत असणे, त्याचप्रमाणे उर्दू भाषा लिहिता व वाचना येणे आवश्यक असल्याचे नियमात नमूद केले आहे.  मात्र तसेच होत नसल्यचे दिसून आले आहे, तरी शासनाने उर्दू भाषा लिहिता व वाचता येणाऱ्या अंगणवाडी सेविका/मदतनीस व इतर पदांची नेमणूक करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ जुलै, २०२४**

**श्री.जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महिला व बालविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई